**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ मधील निशाण नं. ०५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे तुर्तातुर्त ताकिदीसाठी दाखल करण्यात आला आहे.

२. **वादीची वादकथने थोडक्यात खालील प्रमाणे.**

**परिशिष्ट अ**

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ अ | १—३९—९० | ७—०० |
| | | | पो.ख. ०—२२—७५ | |
| २ | ४० | १ ब | १—३९—९० | ७—०० |
| | | | पो.ख. ०—२२—७५ | |

**परिशिष्ट ब**

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४१ | १ | ६—२८—० | २—५० |
| | | | पो.ख. २—१२—० | |

३. दावा मिळकत परिशिष्ट अ मधील मिळकती या वादीच्या प्रत्यक्ष मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष कब्जाभोग्य व वहिवाटीच्या आहेत. त्या दोन्ही मिळकती एकमेकांना लागुन आहेत. दावा परिशिष्ट ब मध्ये असलेली मिळकत प्रतिवादी व त्याचे अन्य सहहिस्सेदार यांच्या मिळुन असणा—या सामाईक मिळकत आहे. तरी सदर प्रतिवादी व सहहिस्सेदार हे त्या जागेमध्ये कुळ असल्यामुळे त्यांचा सदर मिळकतीमध्ये स्वतंत्र कुळ हक्का नुसार कब्जा वहिवाट आहे. त्यांना कुळ कायदयाचे कलम ३२ग प्रमाणे विक्री देखील झालेली आहे. परिशिष्ट ब मध्ये असलेल्या मिळकतीमधुन परिशिष्ट अ कडे जाणा—या मिळकतीचा रस्ता हा या दाव्यातील वादाचे कारण आहे.

४. सदर रस्त्याबाबत प्रतिवादीं बरोबर वादीचा वाद झाल्यामुळे केवळ त्यांचे विरुध्द प्रस्तुत दावा दाखल केला आहे. इतर कोणत्याही सहहिस्सेदाराची वादीला हरकत नसल्यामुळे त्यांना या दाव्याचे कामी पक्षकार केलेले नाही. दावा परिशिष्ट अ व ब या मिळकतीची भौगोलिक परिस्थिती पाहता परिशिष्ट अ मधील मिळकतीच्या दक्षिण, पुर्व, व

पश्चिम हद्‌दीला कर्ली खाडीपात्राचा भाग आहे. त्या जागेमध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजने अंतर्गत वादीने दावा मिळकत विक्रीत घेण्यापुर्वी ग्रामपंचायत परुळा बाजार तर्फे खाडीच्या खा–या पाण्यापासून शेती बागायती जमिनीचे संरक्षण होण्यासाठी स्थानिकांच्या मागणी नुसार अडीच मिटर उंचीचा व दोन मिटर रुंदीचा संरक्षक बंधारा देखील बांधलेला आहे. त्यामुळे दावा परिशिष्ट अ मिळकतीमध्ये जाण्या–येण्यासाठी उत्तरेकडून म्हणजे परिशिष्ट ब कडून येणा–या वाटेचा वापर वादी याला करावा लागतो. त्या वाटेबाबतचा नकाशा त्यांनी दाव्यासोबत जोडलेला आहे. सदर वाट ही उत्तर–दक्षिण अशी असून ती १० फुट रुंदीची आहे. तिचा वापर वादी हा गेली २० वर्षाहून अधिक काळापासून, सतत, विना हरकत, विना तक्रार करण्यात आलेली आहे. सदर रस्त्याचा वापर म्हणजे नकाशामधील अ ते ब याचा वापर वादी व त्या मिळकतीचे पुर्वीचे मालक ब–याच दिवसांपासून करत होते. त्याचा वापर प्रतिवादी देखील करत आलेला आहे आणि करत आहे.

५. वादी पुढे असे सांगतो आहे की सदर रस्त्याच्या वापरावरुन प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे मध्ये वाद निर्माण झाला होता. त्यास अनुसरुन नि.दि.मु.नं. ४/२०११ दाखल करण्यात आला होता. सदर दावा कायम ताकिदीसाठी दाखल करण्यात आलेला होता. या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी त्या दाव्यात हजर होवून त्यांची कैफियत सादर केलेली होती. त्या कैफियतीमध्ये सदर प्रतिवादी यांनी दावा रस्त्याचे अस्तित्व १० फुट रुंदी सहीत मान्य केले होते. त्याप्रमाणे कैफियतीसोबत हात नकाशा जोडून त्यामध्ये नमुद केलेल्या रस्त्याच्या आधारे प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. १ विरुध्द रस्त्याबाबत easement by necessity, easement by prescription व customary right चा हक्क प्रस्तापित होवून त्याप्रमाणे सदर रस्त्याचा वापर करण्यास प्रतिवादी क्र. १ याने हरकत करु नये अशी ताकिद प्रतिदाव्याने मागितलेली होती. त्या दाव्यामध्ये वादी व प्रतिवादीच्या मागणीप्रमाणे रस्त्याचे वस्तुस्थिती बाबत अहवाल दाखल करण्यासाठी कोर्ट कमिशनर यांची नेमणुक करण्यात आली व कोर्ट कमिशनरचा अहवाला सहीत आलेल्या नकाशामध्ये दावा रस्ता दाखविण्यात आला. सदर कोर्टकमिशनचा नकाशा आल्यानंतर त्यातील वादी म्हणजे या कामातील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा चालविण्यास स्वारस्य न दाखविल्याने तो दावा रद्‌द करण्यात आला. तसेच त्या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचा प्रतिदावा देखील रद्‌द करण्यात आला. सबब कसेही असले तरी त्या दाव्यामध्ये दावा रस्त्याचे अस्तित्व प्रस्तापित झाल्याचे वादीचे म्हणणे आहे.

६.  दावा मिळकत व खाडीपात्र यांच्या मध्ये जो काही संरक्षक बंधारा बांधलेला आहे त्यामध्ये लागणारे सर्व सामान दावा रस्त्यावरुनच आणले गेले. त्याचप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीने कोळंबीचा प्रकल्प हाती घेतलेला असून त्याकरीता जे काही बांधकाम करणार आहे त्याचे सामान देखील वादीने रस्त्यावरुन आणलेले आहे. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने होणारी सर्व वाहतुक देखील दावा रस्त्यातून होते. सबब दावा रस्त्यावरुन जाण्या–येण्याचा, वाहने नेण्या–आणण्याचा वादीचा easement by prescription & easement by lost of grant and customary right ने हक्क असल्याचा वादीचे म्हणणे आहे.

७.  अशी परिस्थिती असताना नोव्हेंबर २०१७ च्या शेवटच्या आठवडयात प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. २ कडील दावा रस्त्यावरुन वादीने कोणतीही वाहतुक करायची नाही असा निरोप दिला. त्यावेळेस वादी व त्याचे वडिलांनी प्रतिवादी क्र.१ ची समजुत काढली तेव्हा प्रतिवादी गप्प राहिला. मात्र त्यानंतर एप्रिल २०१८ मध्ये कोळंबी प्रकल्प संदर्भात कामासाठी आणलेला ट्रॅक्टर परिशिष्ट अ मिळकतीमध्ये येत असताना प्रतिवादी क्र. २ हिने तो ट्रॅक्टर अडविला आणि त्या रस्त्यावरुन वाहतुक करायची नाही असा अटकाव करुन तुमच्या मिळकतीत जाण्यायेण्यासाठी दुसरा पर्याय बघा अशी धमकी दिली. प्रतिवादी क्र. २ हिला वादी व त्याचे वडिलांनी समजाविण्याचा बराच प्रयत्न केला. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे कुटुंबातील असल्यामुळे ती सर्व एकमेकांच्या संगणमतात आहेत. सबब येत्या काही दिवसांत प्रतिवादी हे दावा रस्ता बंद करण्याची दाट शक्यता असल्याचे वादीचे म्हणणे आहे. अशाप्रकारे जर दावा रस्ता बंद झाला तर वादीचा कोळंबी प्रकल्प बंद होणारा असून वादी तर्फे करण्यात आलेली लाखो रुपयांची गुंतवणुक वाया जाणार आहे. त्यामुळे वादीचे पैशाने भरुन न येणार असे नुकसान होणार आहे. मात्र प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी स्वत: अगर अन्य कोणाही मार्फत दावा रस्त्यावर गडगा घालू नये अगर कोणत्याही प्रकारे अडथळा करुन दावा रस्ता बंद करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद मागितलेली आहे.

**प्रतिवादीचे वादकथने थोडक्यात खालीलप्रमाणे–**

८.  प्रतिवादी क्र. १ याने निशाण ४५ येथे तुर्तातुर्त ताकिद अर्जावर आपले म्हणणे मांडलेले आहे. प्रतिवादी क्र. २ हिने निशाण ४८ येथे तुर्तातुर्त ताकिद अर्जावर म्हणणे

मांडलेले आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी निशाण ४९ येथे तुर्तातुर्त ताकिद अर्जावर आपले म्हणणे मांडलेले आहे. प्रतिवादी क्र.३ मार्फत या अर्जास म्हणणे देण्यात आलेले नाही. सदर प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले असता त्यातील मजकुर एकच आहे. सबब मी त्यांचे म्हणण्याचा सारांश एकत्रात नमुद करतो.

९. सदर प्रतिवादींनी वादीच्या दाव्याचे खंडण केलेले आहे. परिशिष्ट ब मधील मिळकत ही प्रतिवादी व इतर सह हिस्सेदार यांना कुळकायद्या अंतर्गत प्राप्त झालेली आहे हे त्यांना मान्य आहे. मात्र त्या मिळकतीचे अद्याप सरसनिरस धडेवाटप झालेले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र काही सहभागधारकाच्ळ समजुतीने अनेक वर्षाची कब्जावहिवाट आपआपल्या हिश्श्याचे क्षेत्रात अव्याहतपणे चालु आहे. त्या मिळकतीमध्ये प्रतिवादी व इतर लोकांची बरीच घरे आहेत. त्यांच्या मते परिशिष्ट ब या मिळकतच्या उत्तर दिशेने लागून सर्व्हे नं. २८ ची हद्द असुन तेथुन परिशिष्ट ब च्या मिळकतीतील सहभागधारक बाळकृष्ण विष्णु तुळसकर वै. लोकांच्या कब्जाभोग्यात असलेल्या भागापर्यंत येवून पुर्व बाजुस जाणारी एक पक्की सडक आहे. सदर सडकेवरुन प्रतिवादी व त्याचे इतर सह भागधारक यांना त्यांच्या घराकडे जाण्यासाठी एक खाजगी पायवाट आहे. ती पायवाट बाळकृष्ण विष्णु तुळसकर वै. लोकांच्या कब्जाभोगात असलेल्या भागापर्यंत येते व तेथेच संपते. सदर पायवाट परिशिष्ट ब मिळकतीच्या कोणत्याही हद्दीस पोहचत नाही.

१०. प्रतिवादी व इतर यांचे दरम्यान दाखल झालेल्या नि.दि.मु.नं. ४/२०११ व त्यामध्ये काढण्यात आलेला नकाशाचे गैरफायदा घेवून वादीने प्रस्तुतचा दावा आणल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे. त्यांच्या मते दाव्यातील निशाण १ सोबतच्या नकाशात रेखाटलेला रस्ता व या दाव्यात वादी दर्शवित असलेला रस्ता हा एक नाही. तसेच त्या दाव्यामध्ये प्रतिवादीने जे काही रस्ता असल्याचे नमुद केले होते ती वाट देखील आता नष्ट झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. नि.दि.मु.नं. ४/२०११ मधील निशाण २१ सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे त्या मिळकतीत प्रतिवादी क्र. १ याने घातलेला गडगा आजही प्रत्यक्ष जागेवर आहे. वादीच्या मते जो काही रस्ता या दाव्यात दाखविण्यात आला आहे तो सदर कच्च्या रस्त्यास जोडून प्रतिवादी क्र. १ च्या गडग्याला वळसा घालून पुढे थेट परिशिष्ट अ च्या आपल्या मिळकतीपर्यंत नेवून जोडलेला आहे. सबब सदर दाव्यातील नकाशाप्रमाणे असणारा रस्ता व या दाव्यातील वादीने काढलेला नकाशा हा भिन्न आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

११. वादी हा नि.दि.मु.नं. ४/२०११ मधील पक्षकारांच्या दरम्यान काढण्यात आलेला नकाशाचा आता गैरवापर करत आहे. सदर दोन्हीही रस्ते भिन्नभिन्न आहेत. प्रतिवादींनी पुढे असे नमूद केले आहे की सदर दाव्यामध्ये रस्त्याबाबत कोर्ट कमिशन नकाशाचे अवलोकन केले असता उत्तरेकडील लागुन सर्व्हे नं. २८ कडून परिशिष्ट ब च्या मिळकतीत येणारी काळया तुटक रेषांनी दाखविलेली एक पक्की सडक असून ती काही अंतर आत आल्यानंतर मग पुर्व दिशेकडे वळते व तशीच पुढे जाते. ज्याठिकाणी सदर सडक पुर्व दिशेस जाण्यासाठी वळते तुथून त्या सडकेकडून आत येणारा एक कच्चा रस्ता दिसत आहे आणि तो कच्चा रस्ता काही अंतरावर मध्येच संपतो. सदर कच्चा रस्ता दावा परिशिष्ट ब च्या मिळकतीच्या कोणत्याही हद्दीस जावून मिळत नाही. त्या नकाशातील केवळ अ, ब, क, ड या मराठी अक्षरांनी दर्शविलेला रस्ता वगळता जागेवर रस्ता दिसून येत नाही असा उल्लेख करण्यात नकशात आलेला आहे. त्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ याने गडगा देखील घातलेला आहे. सबब त्या दाव्यातील निशाण २१ येथे जो अंदाजित नकाशा तयार करण्यात आला आहे तो वस्तुस्थितीशी विसंगत आहे असे प्रतित होते. त्या नकाशात देखील मंगेश लवू तुळसकर याने घातलेला गडगा असल्याचे त्या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कबुल केलेले असल्याने त्या ठिकाणाहून रस्ता आहे असे प्रस्थापित होत नाही. सबब यावरुन वादीचा खोटारडेपणा समोर येतो. सबब त्या मिळकतीतून परिशिष्ट अ च्या मिळकतीकडे जाणारा कोणताही रस्ता अस्तित्वात नव्हता असे स्पष्ट होते.

१२. कोर्ट कमिशन झाल्यानंतर आतापर्यंत प्रत्यक्ष जागेवरील स्थितीत बराच बदल झालेला असल्यामुळे, त्यावेळेस दिसुन आलेला कच्चा रस्ता देखील आजरोजी प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात नाही. वादी याने दावा परिशिष्ट अ मधील मिळकतीत वडिलांना कुळअखत्यारी म्हणुन घेतले असल्यामुळे व तो कणकवली येथे रहात असल्यामुळे तो केव्हाही दावा परिशिष्ट अ मधील मिळकतीमध्ये आलेला नसल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे. त्यामुळे सदर व्यवहार बेनामी स्वरुपाचा असून वादी याचा त्या जागेमध्ये कधीही कब्जा वहिवाट नव्हता असे प्रतिवादींचे म्हणणे आहे. वादीने सदर मिळकत खरेदी केल्यावर ज्याअर्थी असे कथन केले आहे की त्याने परिशिष्ट ब च्या दक्षिण हद्दीला काटयांचे कुंपण केलेले आहे, त्याअर्थी तेथुन रस्ता असल्याचे वादीचे कथन पश्चात बुध्दीचे असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे. नि. दि.मु.नं. ४/२०११ मधील पक्षकारांचे हेवेदावे संपुष्ठात आल्यामुळे व कोर्ट कमिशन नंतर त्यांचे आपआपसात समधान झाल्यामुळे त्यांच्यातील वाद शिल्लक राहिला नाही. त्यामुळे

वादीचा दावा व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा प्रतिदावा निकाली करण्यात आला.

१३. सबब कोणतेही अस्तित्व नसलेली वाट निर्माण करण्याचा वादीचा प्रयत्न असल्याचे प्रतिवादीचे म्हणणे आहे. त्यांनी पुढे असे देखील म्हंटले आहे की वादीचे घर परुळे दुतोंडवाडी येथे असल्यामुळे वादी, त्याचे वडिल व त्याचे कामगार तेथुन गाऊडवाडी मार्गे म्हणजेच दावा परिशिष्ट अ मिळकतींच्या दक्षिण दिशेकडील खाडीपात्रातुन बोटीने थेट परिशिष्ट अ मिळकतीमध्ये ये—जा करतात असे त्यांचे म्हणणे आहे. त्या मिळतीमध्ये सामानाची ने—आण त्याच नदीपात्रातील मार्गाने केली जाते. वादीकडे फायबर बोट आहे. दावा मिळकतीमध्ये वादी याने कोळंबी प्रकल्प सुरु केला होता. मात्र आजरोजी तो अस्तित्वात नाही. तो प्रकल्प निट चालला नसल्यामुळे डबघाईला आला. त्यामुळे परिशिष्ट अ ची मिळकत विक्रीत देण्याची वेळ वादीवर ओढवलेली आहे. मात्र त्या मिळकतीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग नदीपात्रातून असल्यामुळे ती विक्री घेण्यास लोकांनी नापसंती दाखविली आहे. सबब त्यामुळे वादी हे आता प्रतिवादींचे मिळकतीतून वाट निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

१४. प्रतिवादींनी पुढे असे नमूद केले आहे की वादीच्या कथनाप्रमाणे परुळे बाजारपासून माकडामवाडीकडे जाणारा ग्रामपंचायत रस्ता अस्तित्वात आहे. प्रतिवादींनी सदर मिळकतीतील सह भागधारकांना पक्षकार करुन घेणे आवश्यक होते. सबब वादीने न्यायालयाची दिशाभुल व फसवणुक करुन एकतर्फा आदेश मिळविलेला आहे. वादी याचे हितामध्ये मनाई मिळाल्यास प्रस्तुत प्रतिवादी व इतर सहभागधारक यांचे विरुध्द अन्याय होणार असून त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

१५. तुर्तातुर्त ताकिद अर्जावरती एकतर्फा आदेश झाल्यानंतर एक घटना घडलेली असुन त्या अनुषंगाने या म्हणण्यातील परिच्छेद 'ज' मध्ये प्रतिवादींनी काही मजकुराचा उल्लेख केलेला आहे. मात्र त्याबाबतचा विशीष्ट वेगळा अर्ज निशाण ३३ येथे सादर केलेला असल्यामुळे सदर मजकुराचा उपयोग त्या अर्जाचा निर्णय देण्यास उपयुक्त ठरणार आहे. तसेच सदर मजकुर प्रतिवादींनी निशाण ४१ येथे व निशाण ३३ बाबत सादर केलेल्या म्हणण्यामध्ये देखील नमूद केलेले आहे.

१६. सबब दोन्ही बाजुचे अवलोकन केले असता माझे समक्ष खालील मुद्दे

उपस्थित राहातात व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनी दावा वादी यांचे लाभात आहे का? | :— होकारार्थी |
| २ | न्यायाचे समतोलत्व मनाई देण्याच्या बाजुने झुकत आहे का? | :— होकारार्थी |
| ३ | मागणीप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद न दिलेस वादी याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | :— होकारार्थी |
| ४ | आदेश काय? | :—येणेप्रमाणे |

## का र ण मि मां सा

१७. **मुद्दा क्र.१ ते ३** :—

दोन्ही पक्षकारांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. या अर्जासंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

१८. दोन्ही बाजुंचा विचार केला असता या गोष्टीमध्ये काही वाद नाही की परिशिष्ट अ ही मिळकत वादीच्या मालकीची आहे आणि परिशिष्ट ब ही मिळकत प्रतिवादी व अन्य काही सहहिस्सेदार यांच्या मालकीची आहे. परिशिष्ट अ च्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केला असता त्या मिळकतींचा बहुतांश भागाला खाडीचे पात्र आहे. त्याचे व्यतिरिक्त सदर मिळकतींच्या परिशिष्ट अ च्या उत्तरेला परिशिष्ट ब ची मिळकत लागुन आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यातून हे देखील स्पष्ट होते की परिशिष्ट अ मिळकतीमध्ये वादी याचा कोळंबी प्रकल्प होता हे त्यांना मान्य आहे. त्यामधून त्यांना सामान आणायला लागत होते हे देखील त्यांना मान्य आहे. तसेच परिशिष्ट ब मिळकतीच्या उत्तर दिशेकडे ग्रामपंचायत रस्ता जातो या गोष्टी बाबत देखील वाद नाही.

१९. या दाव्याचे कामी वादीतर्फे तीन—चार नकाशे सादर करण्यात आलेले आहेत. सदर नकाशाबाबत या दाव्यासोबत हातनकाशा जोडलेला आहे. वादी याने निशाण १० येथे परिशिष्ट अ मिळकतीचा नकाशा सादर केलेला आहे. त्यानंतर नि.दि.मु.नं. ४/२०११ या दाव्यात कोर्ट कमीशनर मार्फत तयार करण्यात आलेला नकाशा देखील दाखल केलेला आहे. तसेच त्याच दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी प्रतिदाव्यात दाखल केलेल्या हातनकाशाची प्रत देखील

या कामी दाखल केलेली आहे. या सर्व नकाशांचे अवलोकन केले असता ही गोष्ट स्पष्ट आहे की परिशिष्ट ब मिळकतीचे उत्तर दिशेकडून एक रस्ता त्या मिळकतीमधुन येतो. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे सदर रस्ता आतमध्ये येतो याबाबत काही वाद नाही. मात्र, त्यांच्या मते सदर रस्ता ठराविक जागेवरुन पुढे परिशिष्ट अ मध्ये जात नाही.

२०. या दाव्यातील रस्त्याचे अस्तित्व दाखविण्यासाठी वादाचे स्वरुप आणि या दाव्यातील वादाचे स्वरुप हे पुर्णत: वेगवेगळे आहे. सदर प्रतिवादींमध्ये नेमका वाद काय होता याची योग्यता या दाव्याचे कामी करणे आवश्यक नाही. मात्र, या दाव्यामध्ये जो काही नकाशा आलेला आहे तो नकाशा प्रथमदर्शी पुराव्यामध्ये या कामी वाचण्यास मला काही हरकत वाटत नाही. अशा परिस्थितीमध्ये सदर नि.दि.मु.नं. ४/२०११ मध्ये कोर्ट कमिशनरने जो नकाशा काढला आहे तो पुरावा घेवून पुढे शाबीत झाला नाही. मात्र, त्या नकाशामध्ये हिरव्या रंगाने एक वाट दाखविलेली आहे. सदर वाट केवळ अ, ब, क, ड याच ठिकाणी असल्याचे नमुद केलेले आहे. त्या नकाशात ती वाट पुढे जाऊन परिशिष्ट अ मिळकतीला मिळते असे प्रतित होते. ती वाट त्यातील पक्षकारांच्या म्हणण्याप्रमाणे आहे अशी नोंद आहे. या अनुषंगाने त्याच जागेबाबत त्या दाव्यातील प्रतिवादी यांनी प्रतिदाव्याबाबत जो काही हातनकाशा सादर केलेला आहे, त्यामध्ये देखील सदर वादातील वाट पुढे परिशिष्ट अ मिळकतीकडे जाते असे प्रतित होते. सदर दोन्ही नकाशामध्ये एक चौथरा असल्याचा उल्लेख आहे. सदर नकाशा हा त्या दाव्यातील वादी म्हणजे या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांचे विनंतीवरुन काढण्यात आलेला होता. सबब सदर नकाशावरुन किमान प्रथमदर्शत: असे दिसते की दावा परिशिष्ट ब मधुन दावा परिशिष्ट अ मिळकतीकडे एक वाट होती व तसे अस्तित्व त्या दाव्यातील प्रतिवादींनी प्रतिदाव्यात मांडले. ते प्रतिवादी या दाव्यात ही पक्षकार आहेत, मात्र आता ते वाट नाकारत आहेत. नि.दि.मु.नं. ४/२०११ मधील पक्षकार हे या दाव्यामध्ये पक्षकार आहेत. मात्र त्यांची एकंदरीत कैफियत पाहता परिशिष्ट ब मिळकतीमध्ये वादी म्हणतो तशी वाट नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र एकंदरीत परिस्थितीमध्ये त्यांच्याच पुर्वकथनाबाबत त्यांना आता घुमजाव करता येणार नाही. त्यामुळे विशेषत: या दाव्यात सामिल केलेल्या प्रतिवादी क्र. ३, ४ व ५ यांचा समावेश आहे. सबब त्यांनी मांडलेली वस्तुस्थिती आता त्यांना नाकारता येणार नाही. सदर नकाशावरती प्रतिवादींनी सांगितल्याप्रमाणे हरकत घ्यायची झाल्यास त्या अनुषंगाने आणखी कोणता प्रथमदर्शी पुरावा वादीने सादर केलेला आहे हे पहाणे गरजेचे आहे.

२१.  दावा मिळकतीमध्ये वादीचा कोळंबी प्रकल्प होता ही गोष्ट प्रतिवादींना मान्य आहे. त्यांच्या मते आता तो डबघाईला आलेला आहे. तसे जरी असले तरी एके काळी का असेना त्या दावा मिळकतीतील परिशिष्ट अ मध्ये कोळंबी प्रकल्प होता हे तथ्य प्रतिवादींनी कबुल केलेले आहे. यामुळे त्या अनुषंगाने वादीने निशाण ४/५ येथे कोस्टल ॲक्वाकल्चर ऑथॉरिटी यांच्या मार्फत देण्यात आलेल्या परवान्याची छायांकित प्रत हजर केलेली आहे. त्या नंतर कोळंबी प्रकल्प परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी दाखल केलेला अर्ज निशाण ४/६ येथे दाखल केलेला आहे. तसेच सदर परवाना देखील २००७ सालातील आहे. निशाण ४/८ येथे ॲक्वाकल्चर फार्म चे एनरोलमेन्ट कार्ड दाखल केलेले आहे. सदर कार्ड हे दिनांक २७/३/२०१८ च्या पत्राने पाठविले आहे. त्याचप्रकारे निशाण ४/९ येथे गुगल मॅप्स वरुन दाखल केलेला नकाशा सादर केलेला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता परिशिष्ट ब मिळकतीला उत्तर दिशा वगळता इतर सर्व दिशांकडून खाडी पात्र असल्याचे दिसते. त्याच प्रमाणे सदर जागेला ग्रामपंचायतीमध्ये बंधारा बांधल्या बाबतचा कागदपत्र निशाण ५६ येथील अ.क्र १ व ३ येथे दाखल केलेला आहे. कोळंबी प्रकल्प संदर्भात स्टेट बॅक ऑफ इंडिया कडून सन २००६ मध्ये घेतलेले लोनची कागदपत्र निशाण ५६/५ येथे दाखल केलेले आहेत. परिशिष्ट अ मिळकतीमध्ये वादी याने जे.सी.बी. मशीनव्दारे केलेल्या कामाबाबत व्हि. बी. खोत यांना कॉन्ट्रॅक्टर कडून मिळालेली पावती निशाण ५६/६ येथे हजर केलेली आहे. सदर पावती दिनांक १८/४/२००६ रोजीची आहे. त्याच प्रमाणे निशाण ५६/७ येथे गंगाराम राजाराम गोडकर व राजेंद्र गोपाळ चव्हाण या दोघांची प्रतिज्ञापत्र सादर केलेली असून त्यामध्ये सदर दोघांनीही असे सांगितले आहे की परिशिष्ट अ मध्ये वादी हे कोळंबी प्रकल्पाचे काम घेतात आणि तेथे लागणारे सामानाची ने—आण चारचाकी वाहनाने परुळे बाजारपासून माकडमवाडी कडे जाणा—या ग्रामपंचायत रस्त्यापासून पुढे तुळसकर व खडपकर यांच्या प्रत्यक्ष कब्जाभोग्यातील क्षेत्रामधुन ने—आण करतात. त्याठिकाणी कोणताही सार्वजनिक रस्ता नाही. त्याठिकाणी नदी पात्रातून कोणतीही जल वाहतुक करणे अशक्य आहे. यानंतर पुन्हा निशाण ६० येथे वादीतर्फे जिल्हाधिकारी यांच्या कडून सी.आर.झेड संदर्भात करण्यात आलेल्या पत्र व्यवहाराचे कागदपत्र सादर करण्यात आलेले आहेत.

२२.  या एकंदरीत कादपत्राचे अवलोकन केला असता व पुराव्याचे प्रथमदर्शी विवेचन केले असता या गोष्टी प्रथमदर्शी स्पष्ट होते की परिशिष्ट अ मिळकतीमध्ये वेळोवेळी वेगवेगळी बांधकाम म्हणजे बंधा—याचे बांधकाम झालेनंतर वादी यांचे मार्फत कोळंबी

संदर्भातील बांधकाम वगैरे करण्यात आलेले आहे. परिशिष्ट अ मिळकतींची भौगोलिक परिस्थिती पाहता सर्व कामकाज करण्यासाठी जल वाहतुकीचा मार्ग वादी वापरतात ही गोष्ट संभाव्य वाटत नाही. उलटपक्षी, अशा प्रकारचे अवजड काम अगर त्या अनुषंगाने काही सामान ने—आण करायचे असले तर जमिनीवरुनच करावी लागणार आहे. त्याचे एक उदाहरण घ्यायचे झाल्यास ज्याअर्थी सदर मिळकतीमध्ये जे.सी.बी. व्दारे काम केले होते त्याअर्थी तसे यंत्र समुद्रा मार्गे अगर खाडी मार्गे परिशिष्ट अ च्या मिळकतीमध्ये आणणे बिल्कुल शक्य वाटत नाही.

२३. वादीने स्वत:ची केस स्वत:च्या पायावर शाबीत करावी हे तथ्य प्रस्थापित आहे. मात्र जेव्हा प्रतिवादी स्वत:च्या अशा कबुल्या देतो की त्यामुळे वादी याच्या बाजुला दुजोरा मिळतो तेव्हा वादी याची बाजु आणखी भक्कम होते. सबब एकंदरीत पुराव्यामध्ये परिशिष्ट अ मिळकतीमध्ये कोळंबी प्रकल्प होता आणि आहे आणि त्या अनुषंगाने वादी याने खर्च देखील केलेला होता आणि त्याबाबत कामकाज चालु होते या गोष्टी प्रस्तापित होतात. मी या ठिकाणी पुन्हा नि.दि.मु.नं. ४/२०११ मधील नकाशा आणि त्यातील वाटे संदर्भातील काही बाबींकडे येतो. सदर दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता किमान ही गोष्ट स्पष्ट होणारी आहे की परिशिष्ट ब मिळकतीमध्ये उत्तर दिशेकडून एक वाट येते. सदर वाट त्या दाव्यातील काढलेल्या नकाशाप्रमाणे किमान परिशिष्ट अ मिळकतीच्या जवळ येते. त्यामुळे कोर्ट कमीशनर यांनी केवळ अ, ब, क, ड या ठिकाणी वाट असल्याचे जरी नमुद केले असले तरी देखील पुढे वाट दर्शविलेली आहे. त्या दाव्यातील पक्षकारांसमोर या दाव्यातील वादीच्या मिळकतीमध्ये म्हणजे परिशिष्ट अ कडे वाट दाखविण्याचा कोणताही संबंध नव्हता. तरी देखील त्यातील प्रतिवादी यांनी प्रतिदाव्यातील हात नकाशा मध्ये परिशिष्ट ब मिळकतीच्या दक्षिणेला म्हणजेच परिशिष्ट अ च्या उत्तरेला देखील वाट जोडलेली दाखविलेली आहे. स्वाभाविकरित्या उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे त्या वाटेशी तेव्हा त्या दाव्यातील पक्षकारांचे काही देणे—घेणे नव्हते. सबब केवळ काही घरापर्यंत तशी वाट येते असे जे या दाव्यातील प्रतिवादींचे म्हणणे आहे ते न पटणारे आहे. त्या नकाशामध्ये त्या वाटेच्या पुढे कोणताही अडथळा दिसत नाही. त्यामुळे वादी याने सांगितल्याप्रमाणे दावा परिशिष्ट ब मध्ये वाट आहे या गोष्टीला उलटपक्षी दुजोरा मिळतो.

२४. प्रतिवादींतर्फे काही इसमांचे प्रतिज्ञापत्र या कामी दाखल करण्यात आलेले आहे. निशाण ४७/३ आणि ४७/४ येथे मात्र उपरोक्त परिस्थितीमध्ये त्या दोघांच्याही

कथनांना कोणतेही महत्व देता येणार नाही. उपरोक्त परिस्थितीमध्ये वादीने प्रथमदर्शी बाजु प्रस्तापित केलेली आहे. न्यायाचा समतोल हा मनाई देण्याच्या बाजुने झुकलेला आहे याचे कारण म्हणजे मनाई न दिल्यास वादीचा कोळंबी प्रकल्प रखडणारा असुन त्याचे नुकसान होणारे आहे. त्यांना त्यांच्या मिळकतीचा उपभोग घेण्यापासून प्रतिबंध होणारा आहे. उलटपक्षी, त्या नुकसानीचा प्रतिवादींच्या अधिकारासोबत तुलना केल्यास वादीचे पारडे जड ठरणारे आहे. उपरोक्त परिस्थितीमध्ये या कारणास्तव मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४:—**

२५. येणेप्रमाणे मुद्दा क्र. ४ चे निष्कर्ष नोंदविणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. वादीचा तुर्तातुर्त अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होण्यापर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी स्वतः अगर अन्य कोणाही मार्फत दावा रस्त्यावर गडगा घालु नये अगर कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण करुन रस्ता बंद करु नये, तसेच वादीला सदर रस्त्यावरुन ये—जा करण्यासाठी कोणतीही हरकत करु नये.

३. प्रस्तुतचा आदेश हा आज रोजी देत असताना न्यायालयाच्या कामकाजाची वेळ संपलेली असुन आता सायं. ०७.१५ मिनीटांनी वाचलेली आहे. त्यामुळे या कामातील निशाण ३३ मधील आदेश न्यायालयामार्फत राखुन ठेवलेला असुन, तो दिनांक ४/१०/२०१८ रोजी जाहीर करण्यात येईल.

सही/—
विनायक द. पाटील
दिवाणी न्यायाधीश क.स्तर. वेंगुर्ला.

दिनांक— २७/०९/२०१८